## <u>वादीतर्फे सा.क्र. २ याचा पुढील सरतपास वादीतर्फे</u>
## <u>विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>

मी युवराज शांताराम पाटील, वय-६५ वर्षे, व्यवसाय- शेती, रा. कुरुकवाडे, ता. शिंदखेडा जि. धुळे शपथ घेऊन सांगतो की,

०४. माझ्या सदरहु सरतपासाच्या शपथपत्रावरील सही माझी असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण**.

## <u>उलटपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एन. पी. अयाचित यांचेमार्फत-</u>

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आधारकार्डावर माझे नाव युवराज शांताराम पाटील असे आहे. माझे लग्न १९८१ मध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, वादी हनुमंत याच्याशी माझा १९८१ पुर्वीपासुन संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुरुकवाडे व बाम्हणे या गावांची शेजारीशेजारी शिव आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही गावांमध्ये सुमारे दोन ते अडीच कि.मी. इतके अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाम्हणे हे माझ्या मामांचे गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी ही माझ्या मामांची मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हनुमंत हे माझे मामा लागतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी प्रकाश हे माझ्या गावातील रहिवासी असल्याने माझी त्यांच्याशी चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश यांच्या चारी मुलींची २००८ पुर्वीच लग्न झालेली आहेत.

०६. सौदा पावतीचा दस्त शिंदखेडा येथुन लिहुन आणला होता किंवा कसे हे मला माहित नाही. असे काही घडले नाही की, माझ्यासमक्ष ४०,०००/- रुपये दिल्यानंतर कुरुकवाडे येथे सदर दस्त लिहिण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, स्टॅम्प कोणी आणला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्टॅम्प कोणी लिहुन दिलेला

होता हे देखील मला सांगता येणार नाही. सदर स्टॅम्पवर दुल्लभ सखाराम सोनवणे व निळकंठ पुंडलिक पाटील अशांच्या साक्षीदार म्हणुन सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी प्रकाश नामदेव यांची सदर शेती वडिलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे आहे की, अरुण नामदेव सुतार उर्फ हिरे हे प्रतिवादी प्रकाश याचे भाऊ आहेत. सही करीत असतांना अरुण नामदेव हजर होते किंवा कसे हे मला आज रोजी सांगता येणार नाही. मी सही करण्याच्या आधी स्टॅम्प वाचला होता. सदर स्टॅम्पवर अरुणचे नाव नव्हते. (आता साक्षीदारास नि. क्र. ४७ कडील सौदा पावती दाखविण्यात आली.) हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या सौदा पावतीवर लिहुन देणार म्हणुन प्रकाश व अरुण अशी दोन नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अरुणचे नाव असलेल्या स्टॅम्पवर मी सही केली होती. मी स्वत:हुन सांगतो की, मी सौदा पावतीवर सही केली नव्हती.

०७. २०,०००/- रुपयांच्या वरचा व्यवहार असल्यास रोखीने रक्कम अदा करता येत नाही किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश नामदेव सुतार यांना शेत गट क्र. ६३२ व ६३३ ही विक्री करायची होती असे त्यांनी मला सांगितले हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व निळकंठ यांनी ती गोष्ट हनुमंत यांना सांगितली व आमच्या मध्यस्थीने २९.०८.२००८ रोजी वादी हनुमंत व प्रतिवादी प्रकाश यांच्यामध्ये सौदा पावती झाली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस प्रतिवादी प्रकाश याचा मुलगा दादाभाई हा हजर होता, त्यादिवशी स्टॅम्प मागविण्यात आला, बयानापोटी वादी हनुमंत यांनी रक्कम मागवुन घेतली व त्यादिवशी मी, निळकंठ व प्रकाश यांच्या मुलांसमक्ष वादी हनुमंत यांनी प्रतिवादी प्रकाश यास रक्कम रु. ४०,०००/- रोखीने अदा केली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच त्यानंतर सौदा पावतीचा दस्त लिहण्यात येवुन आमच्यासमक्ष वादी हनुमंत व प्रतिवादी प्रकाश यांनी सहया केल्या हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दस्तावर साक्षीदार म्हणुन सही केली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, निळकंठ पुंडलिक पाटील यांनी देखील सहया केल्या हे मी खोटे कथन करीत आहे. माझ्या सरतपासातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे टंकलिखित केलेला आहे. सदर मजकुर टंकलिखित करीत असतांना 'मी

साक्षीदार म्हणुन सही केली' असा मजकुर सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सौदयाची उर्वरित रक्कम १३५३५/– ही खरेदीखत नोंदते वेळी दयायचे वेळी ठरले व परवानगी आणण्याचे ठरले हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जुन २०११ मध्ये प्रतिवादी प्रकाश याने वादी हनुमंत यास शेत गट क्र. ६३२ व ६३३ यांचा ताबा दिला हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन वादी हनुमंत यांच्या ताब्यात आहे हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील नमुद 'तरी प्रस्तुत दाव्यातील दोघेही शेत मिळकतींचा सौदा......... पासुन ते .......... त्यात कुठलही दडपण फसवणुक नाही' हा सर्व मजकुर मी खोटा कथन केलेला आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की, वादी हनुमंत हे माझे सासरे लागतात व त्यामुळे त्यांना मदत करण्याकरीता मी सरतपसाचे खोटे शपथपत्र सादर केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हनुमंत व प्रतिवादी प्रकाश यांच्यामध्ये कोणताही व्यवहार झालेला नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.02.10 17:34:34 +0530

दिनांक : ०९/०२/२०२६
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर,
दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव - गणेश साईनाथ अहिरे,

न्यायालयाचे नांव - दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. - १०.०२.२०२६.

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)